# ओएनजीसी (डब्लूओयू) कर्मचारी संघटना

## मान्यताप्राप्त युनियन

**दिनांक : ७/६/२०१८**

## कर्मचारी संघटनेची वचन पूर्ती

1) कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस श्री. प्रदीप मयेकर हे ओएनजीसी **PRBS Trust** वर अनेक वर्षे मान्यता प्राप्त युनियनचे सरचिटणीस म्हणून कार्यरत होते. **PRBS Trust** अधिक सशक्तपणे कार्यरत रहाण्यासाठी ओएनजीसी व्यवस्थापनाबरोबर वारंवार चर्चा करुन ओएनजीसी कडून सोळाशे सव्वीस करोड रू. अनुदान मंजुर करुन **PRBS Trust** आर्थिक दृष्टया सक्षम करण्यात आला.

2) ओएनजीसी मध्ये फक्त 15 वर्षापेक्षा अधिक सेवा शिल्लक असेल अशा कर्मचाऱ्यालाच PRBS योजनेचा लाभ मिळत होता. यात बदल करून Tenure किंवा Direct एम्प्लॉइजमधील कर्मचारी ओएनजीसीच्या सेवेत कायमस्वरुपी झाल्यानंतर ज्यांचा 15 वर्षापेक्षा कमी कालावधी होता त्यांना देखील PRBS योजनेचा लाभ मिळवून देण्यात यशस्वी.

3) टॉपमन भरतीसाठी व्यवस्थापनाशी वारंवार पत्रव्यवहार करुन समिती गठीत करुन त्यासंदर्भात व्यवस्थापनास प्रस्ताव देण्यात आला त्याच दरम्यान व्यवस्थापनाने अलाऊन्स म्हणून दिलेली तुटपुंजी रक्कम नाकारण्यात आली. यासंदर्भातील टॉपमन कमिटीचा अहवाल मेहसाना येथे झालेल्या मिटींगमध्ये अंतिम टप्प्यात आणून व्यवस्थापनास सादर करण्यात आला.

4) Webice मध्ये ओव्हरटाईम भरताना जाचक असलेली C/OFF मिळणार नाही हि अट रद्द करुन ओव्हरटाईम व C/OFF असे दोन्ही लाभ मिळवण्यात यश.

5) हेलीबेस येथून ऑफशोअरला जाणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी हेलीबेस येथे बॅग्ज ठेवण्यासाठी रॅक्स बनविण्यात आले तसेच तेथे रिक्रीएशन रुम्सची व्यवस्था करुन कॅरम, बुध्दीबळ, बॅडमिंटन, व्हॉलीबॉलच्या खेळांची व्यवस्था करण्यात आली.

6) निर्गुतवणुकीसंदर्भात युनीयन तर्फे निदर्शने करण्यात आली तसेच त्या संदर्भात श्री. तपनसेन, MP CITU तसेच श्री. अनिल देसाई, MP शिवसेना यांच्या समवेत शिष्टमंडळाने पेट्रोलियम मंत्री मा.श्री. धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेऊन विरोध दर्शविला.

7) MOU 2004 च्या अन्याया विरोधात कर्मचारी संघटना त्यावेळी सत्तेत नसताना देखील सन 2008 मध्ये मॅनेजमेंटला पत्र देवून या अन्याया विरुध्द आवाज उठविला. त्याचप्रमाणे सत्तेत आल्यावर प्रत्येक JCM मध्ये MOU 2004 मध्ये झालेला अन्याय मॅनेजमेंटला पटवून देत MOU Review कमिटी बनविण्यात यशस्वी. आज कमिटी अंतीम निर्णायक स्थितीमध्ये असून याचा लाभ ए-1 व ए-2 श्रेणीतील सुमारे साडेसहा हजारपेक्षा अधिक कामगारांना मिळणार आहे.

8) ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांना कॅटरिंगसेवा हि सर्वोत्तम मिळावी यासाठी **Catering Contract** मधील प्रत्येक खाद्यपदार्थाचे **Specification** व **Standard** वाढवून ब्रॅन्डेड वस्तुंचा समावेश करण्यात आला. त्याचप्रमाणे कॅटरींगच्या सर्टीफीकेटवर युनीयनाईज कॅटेगरीच्या कर्मचाऱ्यांची सही बंधनकारक केली.

9) ऑफशोरअमधील कर्मचाऱ्यांचे जमा झालेले C/OFF हे तीन महिन्यात घेण्याबाबत असलेला मॅनेजमेंटचा निर्णय हा कामगार कायद्याविरोधात असल्यामुळे सदर C/OFF हे EL मध्ये Convert करण्याबाबत कर्मचारी संघटनेने केलेली मागणी मॅनेजमेंटने तत्वत: मान्य केलेली असून ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांचे जमा असलेल्या C/OFF चा तपशील घेण्यासाठी सर्व विभागाच्या HR Incharge ला निर्देश देण्यात आले आहेत.

10) SBT मुळे ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांना विमानाच्या तिकीट आरक्षणासाठी गैरसोय होत होती. याबाबत व्यवस्थापनेशी सातत्याने पत्रव्यवहार करुन तसेच बैठका घेवून आरक्षण प्रक्रियेत सुलभता आणली.

11) संपूर्ण ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांची मेडिकल बिले हि पास होण्यास विलंब होत होता. सदर गैरसोय दूर करण्यासाठी ऑफशोअरमधील कंत्राटी वैद्यकिय अधिकाऱ्यांना बिले पास करण्याचा अधिकार मिळवून दिल्यामुळे ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांची मेडिकल बिले लवकर पास होणे शक्य झालेले आहे.

12) ऑफशोअरमध्ये सर्व रिग व प्लेटफार्मवर आपत्कालीन वैद्यकिय सेवेसाठी अत्यावश्यक वैद्यकीय साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली.

13) Tenure बेस कर्मचाऱ्यांना मुंबईबाहेरील रिग्जवर जाण्याकरीता **Air fare** तसेच उत्तम हॉटेलची तसेच CPP सुविधा करुन देण्यात यशस्वी.

14) मागील निवडणूकीमध्ये Tenure Base कर्मचा-यांना मतदानाचा अधिकार मिळू नये यासाठी याबाबत PEU कोर्टामध्ये गेली असता कर्मचारी संघटना या निर्णयाच्या विरोधात कोर्टात जावून या निर्णयाला आव्हान देत Tenure कर्मचाऱ्यांना मतदानाचा अधिकार मिळवून दिला.

15) मुंबई मधून इस्टकोस्ट येथे ड्यूटीसाठी जाणा-या कर्मचाऱ्यांसाठी एअरपोर्टशी संलग्न असलेल्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या. तसेच उत्कृष्ट दर्जाच्या हॉटेलची सवलत प्राप्त करुन देण्यात यशस्वी.

16) ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांचा प्रलंबीत ओव्हरटाइम तसेच 12 तासापेक्षा अधिक ओव्हरटाईमसाठी C/OFF मंजुर करुन घेण्यात यशस्वी.

17) HBA या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या रकमेची कमाल मर्यादा 35 लाखापर्यंत वाढविण्यात आली.

18) ओएनजीसीमधील पाच वर्षे पुर्ण होण्याआधी HBA घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना Bridge loan ची सवलत उपलब्ध करुन देण्यात यशस्वी.

19) अद्ययावत वैद्यकिय सोयीनी सुसज्ज असलेले "ग्लोबल" हे नामांकीत हॉस्पीटल ओएनजीसीच्या पॅनेलवर आणण्यात यशस्वी झाले असून नाशिक व़ इतर शहरातील रुग्णालये पॅनेलवर घेण्याकरीता सातत्याने मेडिकल सेक्शनशी पत्रव्यवहार तसेच प्रत्यक्ष भेटी घेवून प्रयत्न चालू असून नाशिक येथील अपोलो हॉस्पीटल पॅनेलवर घेण्याकरीता अंतीम टप्प्यात आहे.

20) सिक्यूरीटी व फायर सेक्शनमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना युनिफॉर्मच्या Stitching Charge & fire kits च्या रकमेमध्ये वाढ करुन देण्यात आली.

21) Field operator मधून ओएनजीसच्या सेवेत कायमस्वरुपी रुजु झालेले 19 कर्मचाऱ्यांना लॅटरल शिफ्टींगच्या माध्यमातुन **क्रेन-ऑपरेटर** या पदावर नियुक्त करण्यात यशस्वी तसेच बंद करण्यात आलेला क्रेन ऑपरेशन अलाउन्स थकबाकीसह परत चालू करण्यात आला. सर्व 19 कर्मचा-यांची सिनिऑरीटी जॉईनिंग डेट पासुन देण्यात आली.

22) क्रेन ऑपरेटरचे लायसन्स Renewal करण्यासाठी स्वत:ला खर्च करावा लागत होता, तो थांबवून सदर लायसन्स RTI पनवेलच्या माध्यमातून Renewal करण्यात यशस्वी.

23) ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यासाठी व्यायाम व इनडोअर गेमसाठी अत्याधुनीक विविध साधने उपलब्ध करुन देण्यात आली.

24) 26 जानेवारी व 15 ऑगस्ट ला मिळणारे स्विट्स चॉकलेट्स हे मुंबईत कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनाच मिळत होते. त्याची कक्षा वाढवून संपूर्ण ऑफशोअरमधील कर्मचा-यांना सदर सुविधा मिळवून दिली. त्याचप्रमाणे सदर स्वीट्स चॉकलेट्सची किंमत 35/- रुपयावरुन 150/- रुपयापर्यंत वाढविण्यात आली.

25) **Data Card** सवलत चतुर्थ श्रेणीतील कर्मचा-यापर्यंत मिळवून देण्यात यशस्वी.

26) LapTop Class-III आणि Class IV मधील सर्व कर्मचाऱ्यांना मिळवून दिला. Class-IV पर्यंतच्या कर्मचाऱ्यांना LapTop ची सुविधा इतर PSU च्या तुलनेत केवळ ओएनजीसी मध्येच आहे. त्याचप्रमाणे LapTop च्या ॲडव्हान्सच्या रकमेत वाढ करुन चार वर्षाचा कालावधी हा कमी करुन 3 वर्षांवर आणण्यात आला आहे.

27) मोबाईलची सुविधा Class III व Class IV पर्यंत सर्व कर्मचाऱ्यांना मिळवून देण्यात आली आणि त्याचप्रमाणे मोबाईलच्या रकमेत वाढ करुन त्याचाही कालावधी कमी केला.

28) कर्मचारी व त्यांच्या परिवाराकरिता चष्म्यासाठी मिळणाऱ्या रकमेत वाढ करण्यात आली.

29) White Goods च्या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या रक्कमेत वाढ केली तसेच वार्षिक मेटनन्स चार्जेस 10% वरुन 12% पर्यंत वाढवून कालावधी कमी करण्यात आला.

30) CSSS या योजने अंतर्गत मिळणाऱ्या नुकसान भरपाईची रक्कम-
30 लाखावरुन - 45 लाखापर्यंत
45 लाखावरुन - 60 लाखापर्यंत
60 लाखावरुन - 75 लाखापर्यंत
हि वाढ कर्मचाऱ्यांचे कोणतेही मासीक Contribution न वाढविता करण्यात यशस्वी.

31) ऑफशोअरमधील कर्मचाऱ्यांसाठी Toiletry kits ची सुविधा चालू करण्यात आली. आज साधारण रु. 1600/- पर्यंत किंमतीचे Toiletry kits प्रत्येक कर्मचाऱ्यांना मिळत आहेत.

32) W-7 या कॅटेगीरीतील कर्मचाऱ्यांकरिता कारचा CMRE हि सुविधा देण्यात यशस्वी आणि हि सवलत फक्त ओएनजीसी मध्येच उपलब्ध आहे.

33) 11 हाई येथील कॅन्टीनमधील सर्व फर्निचरची नविन खरेदी.

34) पनवेल कॅन्टीनसाठी नवीन फर्निचर खरेदी.

35) Education loan याची मर्यादा 10/15 लाखावरुन 30 लाखापर्यंत वाढविण्यात यशस्वी.

36) Vehicle Insurance - कर्मचारी वापरत असलेल्या फोर व्हीलर वाहनाच्या विम्याच्या रक्कमेची वाढ केली.

37) मेडिकल डिपेडन्सी करिता आई-वडिल हे कर्मचाऱ्यासोबत रहाणे बंधनकारक आहे हि अट शिथिल केली.

38) आशा किरण योजना 31 December, 2007 पूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी कार्यान्वीत करण्यात आली. तसेच त्या कालावधीत मृत झालेल्या कामगारांच्या परिवारासाठी सुध्दा ही योजना लागू करण्यात आली.

39) मुंबई कार्यालयातून उरण, न्हावा, पनवेल येथे जाणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असणाऱ्या बससेवेसंबंधी मॅनेजमेंटशी वारंवार चर्चा करुन वातानुकुलीत बससेवा सुरु करण्याबाबत कारवाई पूर्ण झालेली असून लवकरच सदर सेवा कार्यान्वीत करण्यात येत आहे.

40) सेवानिवृत्तीनंतरही दिव्यांग पाल्यास मेडिकल सवलत कायम स्वरुपी करुन घेण्यात यशस्वी.

41) Class III आणि Class IV कर्मचाऱ्यांना हॉस्पीटलमधील उपचारासाठी TWIN SHARING ची सुविधा मिळवून देण्यात यशस्वी.

42) 'S' Category तील कर्मचाऱ्यांना हॉस्पीटलच्या सुविधाबाबत Twin sharing ऐवजी Single room मिळवून देण्यात यशस्वी.

43) 'S' Category तील कर्मचाऱ्यांची बंद करण्यात आलेली Airfare सवलत पुन्हा चालू करण्यात यशस्वी.

44) MSS - मरिन सिक्यूरीटी सुपरवाइजर मधील कर्मचाऱ्यांना HRA चालू करुन दिला.

45) ऑफशोअर वरुन येणाऱ्या कर्मचाऱ्यांना हेलीबेस ते हेलीबेस-गेट शटल सर्व्हिसची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली.

46) सन 1983 पासुन दरवर्षी मुंबईतील सर्व आस्थापनात रक्तदान शिबिराचे आयोजन करुन ऑल इंडियातून वैद्यकिय उपचारासाठी येणाऱ्या ओएनजीसी परिवारासाठी रक्ताची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. या वर्षी 13 शिबिरातुन विक्रमी 1700 रक्ताच्या बाटल्या जमा करण्यात आल्या.

47) मराठी भाषा अंतर्गत अमराठी भाषिकांसाठी मुंबई विद्यापिठामार्फत मराठी भाषा प्रमाणपत्र परिक्षा यशस्वी रित्या घेण्यात आली. मुंबई क्षेत्रातून 100 कर्मचाऱ्यांनी भाग घेऊन परिक्षा उत्तीर्ण केली.

48) कामगारांच्या कलागुणाना संधी मिळावी म्हणुन गेल्या 7 वर्षापासुन दिवाळी सणात रांगोळी स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात येते. यावर्षी 250 स्पर्धकांनी भाग घेऊन स्पर्धा यशस्वी केली.

49) ऑफशोअर मधील एम्प्लॉईजसाठी कार्यालयीन कामासाठी पनवेल बसला हेलीबेस ते ग्रीन हाईट्स अशी व्यवस्था सुरु केली.

50) 11 हाई - एनबीपी ग्रीन हाइट्स - 11 हाई बस सुरु करण्यात आली.

51) WOU Project क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी औषधे केमिस्ट कडून क्रेडिट नोटवर मिळण्यासाठी कर्मचारी संघटना सतत प्रयत्न करीत होती व त्याअनुसार अल्पावधीतच आपल्या सर्वांना औषधे आपल्या कार्यालयात केमिस्ट मार्फत उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. त्यामुळे औषधावरील वार्षीक Income Tax आपल्याला भरावा लागणार नाही. हि सुविधा हाजिरा प्रोजेक्ट मध्ये सुरु करण्यास कर्मचारी संघटनेस यश आले आहे.

52) कर्मचारी संघटना व स्थानिय लोकाधिकार समिती यांच्या विद्यमाने गेल्या चार वर्षापासुन "मराठी भाषा दिन", गुढी पाढवा व शिवजयंती उत्सवाचे यशस्वी आयोजन.

**वरील सर्व कार्याची पूर्तता आपल्या सर्वांच्या भक्कम पाठीब्यामुळे व एकजुटीमुळेच कर्मचारी संघटना यशस्वी पणे करु शकली हे आम्ही प्रामाणिक पणे नमूद करतो व भविष्यात सुध्दा जास्तीत जास्त सुविधा आपल्याला ओएनजीसीकडून मिळवून देण्यास कर्मचारी संघटना कटीबध्द आहे.**

## कामगार एकता झिंदाबाद ! कर्मचारी संघटना झिंदाबाद !!

**आपले स्नेहांकित,**

**(प्रकाश दळवी)**
अध्यक्ष

**(प्रदीप मयेकर)**
सरचिटणीस

## कर्मचारी संघटनेची निशाणी - हेलिकॉप्टर



## हेलिकॉप्टर निशाणीवर शिक्का मारुन कर्मचारी संघटनेस विजयी करा.